Let's take an example. We read road accident cases in newspaper; we get attracted very easily towards such news. Can we leave to drive vehicles ? Have we left driving the vehicles ? No... Rather than giving up driving we learn the lesson that how carefully we should drive. With this example here we can't make things happen according to nature either. We can't take such things lightly, we make our own decisions. There are so many other situations in our life like failure in examinations, family issues or personals issues. Why can't we make them happen like our expectations ? We have the ability to control such situations. We let the things to happen. Is our life really that insignificant ?

According to ,me, sometimes part of luck also play the role. If we are confident about the things happen which suits us best. That's the way to deal with each gone and upcoming thing. We can make the things to happen according to us. Well, that requires confidence.

It is said that, **"A smooth sea never made a skilled mariner."** Well I say, why to expect sea to be smooth ? Focus on getting yourself skilled, and then, before you even notice, every voyage will end in merriment.

***



साने गुरुजी



कु. खुशबू लतीफ
FYBCA

सर्व बाजूंनी भोगवादाच्या लाटा उसळत असताना, डोळस बुद्धिवादाचा आणि भौतिक शास्त्रांचा प्रकाश झगमगात असताना, २० व्या शतकात भक्ती, श्रद्धा, परोपकार, आत्मसमर्पण, या दैवी गुणांनी संपन्न असा एक आधुनिक संत जन्मास आला - तो म्हणजे **सानेगुरुजी !**

आजकालची आपली पिढी या गोष्टीवर कदाचित विश्वास ठेवणार नाही. पण, निगर्वी स्वभाव, प्रेमळ वाणी आणि अखंड सेवा हे अलौकिक गुण असलेले ते अद्‌भुत रसायन होते. त्यांचा जन्म २४ डिसेंबर १८९९ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील पालगड येथे झाला. प्राथमिक शिक्षण पालगडला पूर्ण करुन ते पुढील शिक्षणासाठी दापोलीला गेले. त्यापुढचे शिक्षण घेण्यासाठी 'औंध' संस्थानात गेले.

शिक्षणासाठी त्यांनी हाल-अपेष्टा सोसल्या. खाच-खळग्यातून, काट्याकुट्यातून, अनवाणी पायाने, धावत-धावत ते विद्याभ्यासाचा मार्ग हसतमुखाने, आनंदाने आक्रमत होते. बी.ए. उत्तम रीतीने पास झाल्यावर फेलोशिप मिळवून त्यांनी एम.ए. केलं. नंतर साने गुरुजींनी जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे प्रताप विद्यालयात शिक्षकाची नोकरी केली. तेथे ते विद्यार्थ्यांचे वसतिगृह देखील सांभाळत असत. साने गुरुजींनी विद्यार्थ्यांना स्वावलंबी आणि शिस्तप्रिय शिक्षणाचे धडे दिले. साने गुरुजी विद्यार्थ्यांची 'आई' बनून आजारपणात सेवा करीत. काही काळातच ते सर्वांचे आवडते शिक्षक झाले. धन्य ते विद्यार्थी, ज्यांना असे गुरुजी लाभले.

साने गुरुजींनी १९२८ साली 'विद्यार्थी' नावाचे मासिक सुरु केले. १९३० साली नोकरी सोडून ते राष्ट्रीय आंदोलनात सामील झाले. १९३२, १९३४, १९४०, १९४३ साली त्यांनी तुरुंगवास पत्करला. पण या तुरुंगवासातच त्यांच्या अनेक पुस्तकांचा जन्म झाला. 'श्यामची आई' नाशिकच्या तुरुंगातच जन्मली. 'श्यामची आई' या आपल्या आईवर लिहिलेल्या पुस्तकामुळे साने गुरुजी अजरामर झालेले आहेत. आईचे संस्कार मुलांच्या जडणघडणीत किती महत्त्वाचे असतात याचा परिचय आपल्याला त्या पुस्तकातून मिळतो. साने गुरुजी हे प्रसिद्ध लेखक, शिक्षक आणि समाजसुधारक होते.

साने गुरुजींच्या आईचे नाव यशोदाबाई सदाशिव साने असे होते. ज्या पद्धतीचे जीवन साने गुरुजी जगले त्याचे संपूर्ण श्रेय ते स्वतःच्या आईला देत असत. साने गुरुजींनी अवघ्या तीन दिवसांत तीनशे पानांची कादंबरी निर्माण केली. मातृप्रेमाच्या अमृतधारांनी ती कादंबरी तुडुंब भरली. धुळे येथील तुरुंगात असताना आचार्य विनोबा भावे यांनी सांगितलेली 'गीताई' लिहून पूर्ण केली. त्यांचे उत्तरोत्तर जीवन हे एक साहित्यिक म्हणून व्यतित झाले. 'भारतीय संस्कृती', 'कला म्हणजे काय?', 'क्रांतीच्या मार्गावर' ही सर्व पुस्तके त्यांनी तुरुंगातच लिहिली.

साने गुरुजींचे मन अत्यंत संवेदनशील होते. त्यांच्या लिखाणातून ते वारंवार प्रकट होत असे. 'श्यामची आई' या कादंबरीवर आधारलेल्या आचार्य असे निर्मित चित्रपटाला 'राष्ट्रीय सुवर्णकमळ' हे पारितोषिक मिळण्याचा पहिला मान मिळाला होता. साने गुरुजींच्या साधेपणात सत्याचा अविष्कार होता. त्यांनी सुमारे ८० पुस्तके लिहिली. साने गुरुजींच्या 'गोड गोष्टी' म्हणजेच कुमारांवर उधळलेली सुंदर गुणांची, भावनात्मक रंगांची व संस्कृतीच्या सुवासाची कोमल पुष्पेच. त्यांच्या कवितेतील भावना अंतःकरणाला स्पर्श करीत. 'खरा तो एकचि धर्म', 'बलसागर भारत होवा' या गीतात तर शाश्वत मुल्ये भरुन राहिली आहेत.

बलसागर भारत होवो ।
विश्वात शोभुनी राहो ।।
राष्ट्रार्थ प्राण हे उरले ।
मी सिद्ध मराया हो ।।

लोकशाही समाजवादाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी 'साधना' हे साप्ताहिक काढले. भारतातील विविध संस्कृतींमध्ये दळण-वळण व्हावे म्हणून आंतरभारताची स्थापना केली. 'बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो' या त्यांच्या अजरामर गीताने आजही सर्वांना देशभक्तीची प्रेरणा मिळते.

आपल्या भोगतालचे हिंसक, अविचारी जीवन साने गुरुजींच्या प्रेमळ मनाला सहन झाले नाही, तेव्हा त्यांनी १९५० मध्ये आपली जीवनयात्रा संपवली. गुरुजी देहाने गेले, पण त्यांची पुस्तके, लेखन आजही आपल्यापुढे आदर्श ठेवते.

***



Protecting your Digital Forttress: A Guide to Cyber Security



Siona Kulkarni
TYBCA

In today's interconnected world, where data flows freely and technology rules highest, the importance of cyber security cannot be overstated. With every advancement in technology comes new openings for the cyber attackers to intrude the system and create havoc on business and even nations. As we are depending more and more on digital systems, it is creating more and more opportunities for attackers so there is a need for security measures to protect sensitive information.

The Growing Threat Landscapes :

The cyber threat landscape in contantly evolving, with cyber criminals employing increasingly cultured strategies to crack security ans steal valuable data. From phishing attacks that trick individuals into revealing their personal information to ransomware attacks that disrupt the businesses the threats are increasing.

The Basics of Cyber Security :

At its core, cyber security is about protecting digital assets from unauthorized access, use, dislosure, disruption, modification, or destruction. One should know the basics of security for protecting his/her machine or any data from an intruder.

1. Secure Network Infrastucture : The foundation of any effective cyber security strategy is a secure network infrastructure. A secure network infrastructure mainly includes firewall, intrusion detection system (IDS) and some other tools that detect and analyse the network traffic that is incoming and outcoming to prevent unauthorized access.

2. Strong Authentication : Passwords alone are no longer sufficient to keep accounts secure. Biometric based authentication and two-factor authentication are mostly used for strong authentication. As two-factor authentication uses password as well as One Time Password (OTP), it is the most-safest authentication method.

3. Regular Software Updates : Software vulnerabilities as well as loopholes are a major entry point for cyber attackers. The operating system and all the softwares must be updated and security patches must be updated regularly for minimizing the risk of unaothorized access.

The Role of Encryption :

Encryption is important as it acts as a barrier by protecting sensitive data against unauthorized access. Encryption converts plaintext information into ciphertext using the encryption key and it can only be deciphered using the decryption key. So, the data remains safe, as encryption ensures that even if the data is intercepted by masquarader or any other entity it remains unreadable to anyone without proper authorization.

The Future of Cyber Security :

A technology continues to advance, so too will the challenges facing cyber security professionals. The proliferation of Internet of Things (loT) devices, the increasing adoption of cloud computing, and the rise of artificial intelligence all present new opportunities for cyber attackers too exploit vulnerabilities and launch sophisticated attacks.

To stay ahead of these evolving threats, organizations must adopt approach proactive to cyber security that emphasizes continuous monitoring, threat intelligence sharing, and colloboration with industry partners and law enforcement agencies. By working together to identify emerging threats and develop effective countermeasures, we can build a more resilient and secure digital ecosystem for the future.

***

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, आव्हाने आणि संधी.....



ऋतुजा माने
SYBCom

हिऱ्याच्या पैलूतून त्याची मौल्यवान झळाळी, तेज, आभा सारकाही प्रतीत होतं आणि माणसाच मूल्य, तेज, कौशल्य पाझरत ते त्याच्या ज्ञानातून, ज्ञान ही अशी साधना जी नेते साध्याकडे, उद्दिष्टपूर्तीकडे ज्यातून अविष्कार होतो तो नाविन्याचा. विचारांच्या श्रीमंतीत संपन्न असा समाज घडण काळाची गरज आहे. म्हणूनच नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विचारांच्या श्रीमंतीतला संपन्न समाज घडवू शकेल का ? हा प्रश्न सर्वांपुढेच आहे.

याच प्रश्नावरती विचार मांडण्यापूर्वी शिक्षण म्हणजे काय हे सांगण मला गरजेच वाटत.

जिवनात यशाची शिखरे गाठताना मिळालेला काठीचा आधार म्हणजे शिक्षण, स्वाभिमान विकून जिंकण्यापेक्षा हारणं कधीही चांगल हे शिकणं म्हणजे शिक्षण होय असे मला तरी वाटते आणि याच शिक्षणासाठी असलेल्या शैक्षणिक धोरणाला शासनाने मंजुरी दिली आणि देशाला मिळाले एक नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण.

या शैक्षणिक धोरणातील सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे 10+2+3 पूर्वी जो आराखडा होता. तो आता 5+3+3+4 Graduation आणि Post Graduation असा झाला आहे, की ज्यात मुलांच्या वाचन, लेखन, कौशल्यांवर जास्त भर देण्यात आलेला आहे.

तसेच नवीन शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना आपल्या इच्छेनुसार पदवी शिक्षणातून बाहेर पडता येईल आणि पुन्हा शिक्षण सुद्धा घेता येईल म्हणजेच Multiple entry आणि Multiple exit ची सुविधा ही नवीन शैक्षणिक धोरणाने दिली आहे.

तसेच या शैक्षणिक धोरणातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे 'शिक्षण हक्क कायदा' की जो या पूर्वी च्या काळी १० ते १४ या वयोगटांतील मुलांसाठीच लागू होता. पण आता या नवीन शैक्षणिक धोरणामुळे हाच कायदा ३ ते १८ वयोगटांतील मुलांसाठी लागू केला आहे.

शिक्षणातील पहिली पाच वर्षे हा शिक्षणाचा पाया मानला जातो आणि नवीन शैक्षणिक धोरणामध्ये याच पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले जाणार आहे.

या पूर्वीच्या शैक्षणिक धोरणांचा विचार केला तर, असे दिसून येते की, १९६८ साली आलेल्या पहिल्या शैक्षणिक धोरणाचा भर हा मूल्य शिक्षणावर होता. तर दुसऱ्या शैक्षणिक धोरणाचा कल पायाभूत सुविधांवर होता, २००६ ची ATKT असेल २००९ चे Best of Five असेल परंतु आता आलेले शैक्षणिक धोरण हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण असून ते शिक्षणातील कमतरतांचा आणि बदलत्या जागतिक परिणामांचा विचार करणारे हे धोरण ठरेल.

पारंपारिक शिक्षणाला नव्या शैक्षणिक धोरणाने फाटा दिलाय. कला, क्रिडा यांचा देखील समावेश आता मुख्य शिक्षणामध्ये केला गेलाय. मातृभाषेतील प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणातील व्यवसायांचा सर्वांगीण विकास करुन देणारे हे धोरण आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर आपण उच्च शिक्षणात फार लक्षणीय यश प्राप्त करु शकलो नाही. आज उच्च शिक्षणात देशातील सरासरी फक्त २६% विद्यार्थी दिसून येतात. पण या शैक्षणिक धोरणामुळे हेच प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत नेण्याची मोठी संधी आपल्याला मिळाली आहे.

असं म्हणतात की,

'मंजिले उन,हीं को मिलती है जिनके सपनो में उड्डाण होती है' ।

आणि त्याच मंजिल पर्यंत पोहोचण्यासाठी स्वप्नांचे उड्डाण घेण्याची नवी उमेद हे शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना देतय.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना बहुविद्या शिक्षणाची अडचण दूर होऊन आता विद्यार्थ्यांना एकाच वेळी विज्ञान, भौतिकशास्त्र, भूगोल, गणित असे अनेक विषय शिकायला मिळतील यात शंका नाही.

''लेखणी विद्यार्थ्यांना सांगते परिक्षांची कथा, पण याच शैक्षणिक धोरणाने जाणून घेतलीय विद्यार्थ्यांच्या मनाची व्यथा''.

खरंच परिक्षा आणि विद्यार्थी यांच खूप जवळच नातं, परिक्षा म्हंटल की घाबरुन जाणाऱ्या मनाला आणि उत्तर लिहित असताना थरथरणाऱ्या हातांना नवीन शैक्षणिक धोरणाने ताकद देण्याच काम केले आहे. म्हणजेच या शिक्षण धोरणातील पहिल्या तीन टप्प्यांत विद्यार्थ्यांमध्ये असणारी परिक्षांची भिती कमी करुन एक नवीन निर्भिड विद्यार्थ्यांची पिढी घडविण्याचे काम हे शैक्षणिक धोरण करत आहे.

ज्ञानाचा आधार घेऊन समाज घडविण्याची प्रक्रिया जरी या शैक्षणिक धोरणामुळे सुरु झाली असली तरी पुढे जाऊन थोडा विरुद्ध विचार केला तर असे लक्षात येते की, या धोरणाचे उद्दिष्ट ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी कमी करणे आहे, परंतु संसाधने आणि पायाभूत सुविधामधील अंमलबजावणी करणे आव्हानात्मक असू शकते. ५ वी पर्यंतचे शिक्षण जरी मातृभाषा, प्रादेशिक भाषेतून दिले तरी या भाषांशी परिचित नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी हे मोठे आव्हान असू शकते. एवढेच नाही तर शहरापासून दूर असलेल्या खेड्या-पाड्यांमध्ये या शैक्षणिक धोरणातील बदल योग्य पद्धतीने पोहोचतील का हा देखील प्रश्नच म्हणावा लागेल.

तरी देखील भारताला जागतिक 'ज्ञान महासत्ता' बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अंतिम उद्दिष्ट असून १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा सर्वांत मोठा बदल आहे आणि या बदलाचा स्विकार करुन या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे स्वागत तुम्ही आम्ही सर्वांनी नक्कीच केले पाहिजे असे मला तरी वाटते....

***


With the best compliments from

RAMAKANT BOOK SELLERS

249, Bhavani Peth, SATARA-415 002.

☎ : (02162) 234761, 9422606872, 8975981016

Dealers in Engineering Books Stationery & Drawing Material



खतीजा पालकर
TYBA

जिंदगी की दौड में हम झुंज रहे है
फिर भी यारो के साथ हम घुम रहे है
के चल दिये है हम यारो के मेहफिलो में
और खुल कर हसना सिख रहे है ।

पता नहीं कैसी होगी इतनी मुश्किलात नये सफर मे,
यारो के बिना
के पता नही कैसी होगी इतनी मुश्किलात नये सफर
में यारो के बिना

धिरे-धिरे हम यारो से दूर हो रहे है
आसान नहीं है यारो के बीना जिंदगी का रहना
बगीर यारो के हम जीना भूल जायेंगे
ये बाते सोच सोच कर फिर रो रहे है
जिंदगी की दौड में हम झुंज रहे है
दुनिया का सिलसिला तो चलता रहेगा जिंदगी भर

हम तो जिंदगी ही यारो से बना रहे है
होती है कभी कभी नोक-झोक एक दुसरे से
के होती है कभी कभी नोक-झोक एक दुसरे से
फिर भी यारो को मनाना सीख रहे हैं
कभी ना होंगे जुदा एक दुसरे से ये वादा बना रहे है ।

लगता नही के मील पायेंगे ये पल फिर हमे
के लगता नही के मिल पायेंगे ये पल फिर हमे
जिंदगी की दौड में हम चलना सीख रहे है...

'महर्षी' नियतकालिकास



शाहीन महंमदहनिफ सय्यद

'महर्षी' नियतकालिकास



पठाण शबाना



We Are Lucky !



Vaibhavi Avghade
TYBA

I am speaking BA student. This year I am studying in TYBA. The last year of college. Ever since I came to this college I have observed that girls are afraid of English subject. And we choose the English faculty with interest. At first I had no idea what English literature. Later we started to understand everything we were starting to get interested in literature. In fact, I found a good writer in me as I was beginning to realize that I could write better.

There are only ten to eleven of us to learn English literature but there is a something different in literature. In these 2 to 3 years we increased our stage daring, self confidence and now we have confidence to go ahead and speak. Today, If someone tells us to talk about a certain topic, we can talk quickly. We can speak many things not only in Marathi but also in English.

If someone takes the name of English literature, then we proudly say that yes we are student of literature without literature, everything is incomplete. Through literature we get to know how to live a life. When we read all of Shakespear's plays we realize how great writer Shakespeare was ! Many such great writers and poets have been created because of literature.

Many people have a misconception that there is no career ahead with a BA. oh, I guess you have not heard about literature yet.

Even though in the begining I didn't say we are lucky in but this field has taught us a lot. And surely one day we will reach to the highest peak.

And I can proudly say that yes I am literature student.

Literature.....

"The meaning of life,
It understand human better
than anyone."

Literature.....

"The best way to live a life,
It show right path to us."

Literature.....

"The teacher without talking
It teaches reality to people."

***





स्त्री-प्रगतीची मूर्ती



सोनाली पाटेकर
SYBCom

एकविसाव्या शतकात स्वतंत्र भारतातील स्त्रीशिक्षण क्रांतीच्या मोठ्या टप्प्यापर उभे आहे. प्रामुख्याने शहरी विभागापूरते मर्यादित असलेले स्त्रीशिक्षण आता ग्रामीण, दुर्गम, आदिवासी भागापर्यंत विस्तारले आहे. एक स्त्री शिकली की, ती सारे कुटुंब 'साक्षर' करते, संस्कारक्षम करते, या महात्मा फुलेंच्या वचनाला स्मरुन स्त्री-शिक्षणाला भारतवर्षाने प्राधान्यक्रम दिला आहे. पूर्वीच्या व आत्ताच्या समाजामध्ये खूप बदल झाला आहे. फक्त 'चूल आणि मूल' करणारी स्त्री ही आज साक्षर होऊन तिच्या कुटुंबाला व समाजाला साक्षर बनवतं आहे. स्त्रीला शिक्षणाच्या सर्वच क्षेत्रांत समान संधी आहे. आपल्या भारतामध्ये मोलाची कामगिरी करणाऱ्या ''अंतराळवीर कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, भूतपूर्व पंतप्रधान इंदिरा गांधी, गानकोकिळा लता मंगेशकर, अभिनेत्री शबाना आझमी इ.' अशा अनेक स्त्रियांनी मोलाची कामगिरी करुन समाजासमोर आपले कर्तृत्व साध्य केले आहे.

बाबासाहेब आंबेडकरांचा ''शिका आणि संघटित व्हा'' हा मूलमंत्र मुलांप्रमाणे मुलींनाही लागू होतो. बाबासाहेबांनी आपली पत्नी 'रमाबाई आंबेडकर' यांना लिहायला, वाचायला शिकवले आणि त्यांनी स्त्रीशिक्षणाची सुरुवात घरातूनच केली. त्यामुळे समाजाचा स्त्रीकडे व स्त्रीशिक्षणाकडे बघणाऱ्या दृष्टिकोन बदलला. मूलांप्रमाणे मुलींसाठी देखील अनेक संधी उपलब्ध झाल्या तसेच स्त्रीशिक्षण विकास कार्यक्रमांतर्गत शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण, मोफत गणवेश, मोफत पुस्तके, शिक्षिकांची नेमणूक इ. अशा अनेक तरतूदी स्त्री हि साक्षर होण्यासाठी करण्यात आल्या. स्त्रीशिक्षणाच्या वाटचालीत 'कला आणि शिल्प, औषधशास्त्र, पशूवैद्यकशास्त्र, शेती, वनपालन, वाणिज्य, विज्ञान, कायदा, समाज शिक्षण, शारीरिक शिक्षण, नृत्य गायन' इ. अशा अनेक सहशिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या.

सध्याच्या प्रगतशील युगामध्ये महिला ही साक्षर बनून समाजामध्ये आपले सर्वस्व प्रस्थापित करत आहे. कारण स्त्रीशिक्षणाचे महत्व आता सर्वमान्य झाले आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार व प्रचार व्हावा म्हणून केंद्रशासन, राज्य शासन व अन्य विविध संघटनांचे प्रयत्न चालू आहेत. तसेच स्त्रीला एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सबल पंख लाभत आहेत. स्त्रियांच्या म्हणून खास समजल्या जाणाऱ्या नोकऱ्यांकडून संशोधिका, शास्त्रज्ञ, डॉक्टर, पोलिस, अधिकारी, व्यवस्थापक, उद्योजिका इ. अशा एरवी स्त्रियांना खुल्या नसणाऱ्या व स्पर्धात्मक जगात सत्ता हाती असणाऱ्या महत्त्वाच्या स्थानांवरही स्त्रियांचा हळूहळू प्रवेश होऊ लागला. जेव्हा खेड्यांतील व दुर्गम भागांतील प्रत्येक स्त्री शिक्षित आलेली असेल, तेव्हा भारताची नोंद विकसनशील देश अशी न राहता विकसित देश अशी होईल. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने स्त्री शिक्षणाला मोलाचा दर्जा प्राप्त करुन दिला पाहिजे.

स्त्री शिक्षण हि स्त्रीला मिळालेली सुवर्ण संधी आहे आणि या शिक्षणअधिकाराचा उपयोग करुन स्त्रीने स्त्रीशिक्षणाला व देशाच्या प्रगतीला हातभार लावून तीला मिळालेल्या सुवर्ण संधीचे सोने केले आहे. स्त्रीने तिच्या शिक्षणाच्या जोरावर समाजामध्ये शैक्षणिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणले आणि त्यामुळेच समाजाचा स्त्रीकडे बघणाऱ्या दृष्टिकोन बदलला व तिच्या कर्तृत्वच्या जोरावर तीने समाजामध्ये स्वत:चे मोलाचे स्थान निर्माण केले. आधुनिक काळातील स्त्री ही भविष्यकाळातील स्त्रीयांसाठी प्रेरणा ठरत आहेत.

***

शितल झेरॉक्स

Xerox
Lamination
Spiral Binding
Comb Binding
Nylon Stamp
School 'I Card'
Colour Printout (Inject / Lazer)
Jumbo Black / Colour
Cad Print Out
Black Printing
Photo Printing
Large Size Photo Print
Box Files
Wholesale Office Files
All Size A/4 to A/0 Printing & Scanning
Mug & T-Shirt Printing





300, Somwar Peth, Satara-415 002.
Mob. 9975376393 / 9422603593



Addiction to Mobile Phone or Addiction through Mobile Phone ?

Sadiya Shaikh
TYBA



Mobile phones are on inseparable part of our lives. In April 2014, the number of active mobile numbers in the United states exceeded 327 million, Which is greater than US population. According to another research project, as of January 2014, 90% of American adults have a mobile phone & 65% of them use smart phones. On average, people check their mobile phones 150 times a day for different purposes.

Information systems literature examines different phase of it use, such as adoption & continuous use. Adoption of technology is widely studied, where several models have been proposed in the literature to explain user's technology adoption behaviours. After adoption researchers focus on how continuous use of technology routinized in users life. Repetitive usage of a technology astifact in medium or long-term story line, can lead to forming automatic usage behaviours. This phenomenon is defined as habit in the is literature. These is habits by themselves can have some positive or negative consequences. Whenever habitual behaviour result in a loss of control, the negative consequences outweight the positive ones. One such situation recently studied in is research is known as is addiction several recent studies have explored negative consequences of mobile habit & addiction. Some of the negative effects of "Mobile Email Addiction" on individuals personal & professional life; also, several studies have emphasized the role of mobile addiction on car accidents.

In spite of the recent attention to technology addiction there is no consensus in the literature on it's conceptualization or operationalization. Moreover, in the specific case of mobile phone addiction, there is no consensus even on the independent existence of such addiction. Some researcher consider mobile phone addiction as a kind of technology addiction on characterized by technology addiction symptoms i.e. conflict, withdrawal, relapse & behavioural salience. Others strongly believe that mobile phone usage is some other kind of behaviour addiction e.g. addiction to game, shopping gambling etc. manifested through excessive mobile phone usage. Thus, to the second group individuals are not addicted to the mobile device, but through the device by experiencing addiction to the applications. The main purpose of this research is to differentiate between "addiction to the device" & "addiction through the device". For mobile phones we investigate the role of application addiction in the formation of mobile addiction to illustrate that even though they both may occur in high degrees simoultaneously, it is also likely that each can exist at high degrees absent the other one.

***

Latest Configuration of Computer

I) Processor : Intel Core i (12th or 13th-gen)
II) Operating System : Microsoft Windows 11 (Windows 12 in Progress).
III) RAM - 16GB / more
IV) Hard Disk - 2TB
V) Solid state drive (SSD) - 512GB
VI) Monitor Resolution - 2560 x 1440



शेअर्स / स्टॉक



सिद्धी यादव
SYBCA

शेअर, स्टॉक, म्युच्युअल फंड हे सगळे शब्द आपण ऐकले आहेत, पण आपण यात गुंतवणूक करत नाही किंवा आपल्याला याची फारशी माहिती नाही. या लेखाद्वारे मी तुम्हा सर्वांना शेअर या संकल्पनेची माहिती देणार आहे. शेअर या शब्दाचा शब्दश: अर्थ म्हणजेच हिस्सा होय. ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी आपण एक उदाहरण विचारात घेऊ. समजा मला एक व्यवसाय सुरु करायचा आहे व १ लाख रुपये गुंतवूण मी तो सुरु देखील केला तर भविष्यात त्या कंपनीत होणाऱ्या फायद्यासाठी व तोट्यासाठी सर्वस्वी मी जबाबदार आहे, पण याच परिस्थितीत मला माझ्या व्यवसायाचे स्वरुप विस्तारित करायचे आहे, त्यासाठी मला जास्त भांडवलाची गरज आहे, ते उभे करण्यासाठी माझ्याकडे दोन पर्याय आहेत एकतर मी कर्ज काढू शकते किंवा भांडवल बाजारांमध्ये माझ्या कंपनीचे शेअर्स विक्रीसाठी काढू शकते आणि याच प्रक्रियेत कंपनी आपले जे भाग विक्रीला काढते त्याला शेअर्स असे म्हणतात.

समजा मला ३० लाख रुपयांची गरज आहे, एखादा विशिष्ट व्यवसाय सुरु करण्यासाठी तर मी ३ लाख लोकांना आव्हान करेन की त्यांनी मला प्रत्येकी १०रु. द्यावे. या ३ जाख लोकांना मी त्यांनी दिलेल्या १०रु. एकही रुपये देण लागत नाही, कारण मी त्यांच्याकडून कर्ज घेतलेले नसून, त्यांनी मला हे पैसे स्वइच्छेने दिलेले आहेत. कारण त्याचा माझ्या कर्तबगारीवर विश्वास आहे. याच यंत्रणेला कंपनी म्हणतात व ते ३ लाख लोक म्हणजेच शेअर होल्डर्स होय. हे सर्व शेअर होल्डर्स कंपनीचे अंशत: मालक असतात कारण त्यांनी प्रत्येकी १०रु. एवढ्या किमतीचा एक शेअर म्हणजेच एक वाटा विकत घेतला आहे. समजा उद्या कंपनीचे दिवाळे निघाले तर मग या दहा रुपयांचे काय ? तर ते गंगार्पण करायचे. कारण तुम्ही हे १०रु. देऊन कंपनीमध्ये गुंतवणे गरजेचे आहे ज्याचे म्होरके हे चांगले पार्श्वभूमी असलेले आहेत. याही पुढे हा प्रश्न निर्माण होतो की, कंपनीला खूपच मोठा तोटा झाला व कंपनीवरील कर्जही फार वाढले तर मग काय 'शेअर-होल्डर्स' नी घरदार विकून ते फेडायचे का ? तर नाही. कंपनीज् ॲक्ट २०१३ नुसार अश्या प्रसंगी या भागीदारांची (शेअर-होल्डर्सची) जबाबदारी ही केवळ १०रु. एवढीच असते. पण कंपनीला फायदा झाला तर तो भागीदारांचाही असतो. म्हणून कंपनीच्या नावाच्या शेवटी लिमिटेड हा शब्द वापरला जातो.

शेअर्स ही संकल्पना स्पष्ट झाल्यानंतर शेअर होल्डर कोणाला म्हणतात हा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाच उत्तर अस की एखादी कंपनी भांडवल बाजारामध्ये प्रवेश करते त्यावेळी तिला तिच्या विस्तारासाठी दिर्घमुदतीची रक्कम आवश्यक असते यासाठी भांडवल बाजार हा असा बाजार आहे की ज्यात भागांची खरेदी-विक्री होत असते आणि याचे ठिकाण म्हणजेच याद्वारे कंपनी आपली दिर्घमुदतीची गरज पूर्ण करण्यासाठी भाग विक्रीस काढते आणि त्याद्वारे आपली पैशांची मुदत पूर्ण करते. याद्वारे सामान्य जनतेला कंपनीचे भाग खरेदी करता येतात आणि कंपनीच्या नफ्यामध्ये सहभागी होता येते.

या लेखाद्वारे तुम्हाला शेअर आणि शेअर मार्केट याबाबत उत्सुक्ता निर्माण झाली असेल ना ? तुम्हाला अनेक प्रश्न देखील पडले असतील जर तुम्ही याची अधिक माहिती घेऊ इच्छित असाल तर खालील युट्युब चॅनेल्स्ला नक्की भेट द्या व शेअर-मार्केटमध्ये पैसे कसे गुंतवायचे याबाबत सविस्तर माहिती घ्या.

युट्युब चॅनेल्स्ची नावे :

१) सी.ए. रचना रानडे २) प्रांजल कामरा ३) पुष्कर राज ठाकूर

SIP

आत्ताच आपण शेअर-मार्केटबद्दल बेसिक माहिती घेतली. समजा आता मी माझे पैसे शेअर-मार्केटमध्ये गुंतवायला सुरुवात करणार आहे, पण भारतात कितीतरी शेअर विकणाऱ्या कंपन्या आहेत, प्रत्येक दिवशी शेअरची किंमत बदलत आहे. काही शेअर्सची किंमत वाढत चालली आहे तर काहींची किंमत पडत चालली आहे, मग अश्यावेळी मार्केटचा पूर्ण अभ्यास करुन शेअर-ट्रेडिंग करणे गरजेचे आहे. पण हे करण्यासाठी माझ्याकडे पुरेसा वेळ नाही व त्याचबरोबर कोणत्या शेअरची किंमत कधी बदलेल हे समजून घेणे ही मला अवघड जात आहे व मला स्टॉक मार्केटबद्दल जास्त माहिती नाही पण तरीही मला स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूक करायची आहे तर अशावेळी SIP हा

सर्वोत्तम पर्याय आहे.

SIP म्हणजेच Systematic Investment Plan यात नियमितपणे एक निश्चित रक्कम विशिष्ट कालावधीसाठी गुंतवण्यात येते, म्हणजेच मी बँकेला सांगेन की प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला किंवा तीन महिन्यांतून एकदा किंवा वर्षातून एकदा माझ्या सेविंग अकाउंट मधून एक विशिष्ट रक्कम डेबिट होऊन ती म्युच्युअल फंडमध्ये गुंतवली गेली पाहिजे. अश्या प्रसंगी बँक संपूर्ण मार्केटचा अभ्यास करुन आपले पैसे योग्य शेअरमध्ये गुंतवते किंवा आपण असे म्हणू शकतो जेव्हा आपण पैसे SIP मध्ये गुंतवतो तेव्हा एक फंड मॅनेजर मार्केटचा अभ्यास करुन आपले पैसे योग्य शेअरमध्ये लावतो.

थोडक्यात SIP हे RD सारखेच आहे. परंतू त्याचे रिटर्न्स हे शेअर्स बाजारावर अवलंबून असतात. आता समजा मी SIP मध्ये १०० रु गुंतवले व त्याचवेळी NV(नेट व्हॉल्यू असेट) २० रु. असेल तर तुम्हाला NV प्रमाणे ५० युनिटचे/शेअर्सचे वाटप होईल. आता NV जसजशी चढेल तसतसे तुमचे पैसेही वाढत जातील. NV ची किंमत २०रु. वरुन ३५ रु. झाली तर ५० युनिट्ची किंमत १७५० रु. होईल. SIP मध्ये अश्याप्रकारे युनिट्सचे वाटप होत राहते. जेव्हा बाजारभाव चढतो तेव्हा तुम्हाला कमी युनिटस्चे वाटप केले जाते व जेव्हा बाजारभाव चढतो तेव्हा तुम्हाला कमी युनिटस्चे वाटप केले जाते अश्याप्रकारे तुमची गुंतवणूक सरासरी प्रमाणात होत राहते.

SIP हा म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूकीचा फार सोपा व सुरक्षित पर्याय आहे. बर यामध्ये आपण कमीत-कमी ५०० रुपये पासून गुंतवणूक करु शकतो.

मैत्रिणींनो, एक गोष्ट लक्षात ठेवा, शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी, ज्ञानात गुंतवणूक करा.....

शेअर माकेटबद्दल अधिकाधिक माहिती ही सोशल मीडिया ॲप्स्वर उपलब्ध आहे, त्याचा अभ्यास करा व नंतरच पैसे गुंतवा.

***

'महर्षी' नियतकालिकास



अनघा महेश आगटे





अवयवदान...



पूजा होले
FYBCom

अवयवदान हे एक अत्यंत उदात्त आणि सन्माननीय कार्य आहे ज्याचा समाजाला अनेक प्रकारे फायदा हा होत असतो.

जेव्हा डॉक्टर सांगतात की, तुमचा अवयव निकामी झाला आहे, तेव्हा त्या व्यक्तीसमोर जणू काही काळोखच निर्माण होतो. मग समोर उपाय उभा असतो ते म्हणजे अवयव प्रत्यारोपण. पण त्यासाठी अवयवदात्याची गरज असते. मग सुरु होतं ते अवयवत्याची वाट बघणं म्हणजे कारण विज्ञान इतके पुढे गेलेले नाही की शरीराच्या बाहेर अवयव तयार करता येईल. पण इतके पुढे नक्कीच गेले आहे की सृदृढ शरीराकडून घेऊन ते गरजू व्यक्तीला देता येईल.

'अवयव' अर्थातच ठरावीक कार्य करणारा शरीराचा भाग शरीर हे क्षणभंगूर आहे. मृत्यूनंतर नष्ट होते. मात्र अवयवरुपी जिवंत राहायचे असेल तर 'अवयव दान' हाच एकमेव उपाय आहे. अर्थातच अवयवदान हा मनुष्याला मिळालेला एक वरच आहे. जेणेकरुन आपण मृत्यूनंतरही पुन्हा एकदा जगातील सुख मिळवू शकतो, निसर्गाचे सौंदर्य बघण्याची आणि आपुलकीची भावना ही अनुभवण्याची संधी मिळवू शकतो.

मृत्यूपश्चात एक देह सात जणांच्या आयुष्यात एक आशेचा किरण ठरु शकतो. तसेच लोकांच्या आयुष्याचा दर्जा सुधारु शकतो. मात्र आपल्या समाजात आजही अवयवदानाविषयी फारशी जागृती नसल्याने कित्येक रुग्ण वर्षांनुवर्ष प्रतिक्षेत आहेत. अवयवदान हे केवळ डोळे किंवा किडनी पुरता मर्यादित नसून सुमारे १० विविध अवयव आपण ज्ञान करु शकतो. फक्त त्यासाठी पाहिजे पुरेशी माहिती व तुमची इच्छा याचा अर्थ एका मृतदेहामुळे लोकांना आपले पूर्वरत आयुष्य जगण्यास मदत होते. यावरुन असे बोलता येईल की, अवयवदान म्हणजेच... ''मरावे परी देहरुपी उरावे''.

आपल्या अस्तित्वानं अनेकांच्या आयुष्यात फरक पडतो. पण आपलं अस्तित्व असणं संपत तेव्हाही कुणाला तरी त्याचा सकारात्मक फरक पडावा आणि आपल्यानंतर आपल्या शरीराचा कोणाला तरी उपयोग व्हावा याची आठवण करणारा दिवस म्हणजे जागतिक अवयवदान दिन अर्थातच १३ ऑगस्ट. कोणाच्याही अस्तानंतर एखाद्याच्या आयुष्यात नवी पहाट येणार असेल तर त्या गोष्टीकडे आपण सर्वांनी गांभिर्याने बघायला पाहिजे.

तसे बघितले तर अवयवदान व अवयव प्रत्यारोपण हे पुरातण काळापासून चालत आले आहे. श्री. गणपती यांच्यासाठी देखील अवयव प्रत्यारोपणापची प्रक्रिया ही करण्यात आली होती. त्यानंतरच्या काळात सुश्रुत या महान वैद्यांनी देखील 'सुश्रुतसंहिता' या आपल्या पुस्तकात अवयवदान व प्रत्यारोपण याबद्दल माहिती व त्याचे महत्त्व सांगितले आहे. तरी देखील आजच्या आधुनिक काळात अवयवदानाबद्दल काही गैरसमज आहे.

अवयवदानामुळे अंतिम संस्काराला वेळ लागतो. असा काहींचा गैरसमज असतो. पण अवयवदान हे मृत्यूच्या पश्चात १२ ते १४ तासांच्या आत केले जाते. त्यामुळे अंतिम संस्कारांवर त्याचा परिणाम होत नाही. काही लोकांना असे वाटते की, मृत्यूपश्चात नेत्रदान केले तर पुढील जन्मी आंधळेपणा येतो. पण डोळे दान करण्याचा आणि पुढच्या जन्माचा एकमेकांशी काहीही संबंध नसतो. उलट मृत्यूपश्चात नेत्रदान केल्यास तुम्ही इतरांचे आयुष्य प्रकाशमान करु शकाल. त्यामुळे निर्णय तुमच्या हातात आहे.

भारतासारख्या प्रगतीशील राष्ट्रांमध्ये अनेक घडामोडी होत असतात. या प्रगतीचा एक भाग म्हणून अनेक शहरांतून मोठ्या प्रमाणात वृद्धी होत असते. लोक दाटीवाटीने राहतात. त्यामुळे अनेक रोगांना बळी पडतात व त्यांच्या शरीरातील काही अवयव थकतात. मग काही काळानंतर ते निरुपयोगी होतात. शरीरातील कोणताही अवयव निरुपयोगी होणे म्हणजे त्या संपूर्ण कुटुंबाचे शारीरिक व भावनिक दृष्टीकोनातून निरुपयोगी होणे असते. त्यामुळे त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती देखील हलाखीची होऊन जाते. शरीरातील असा एखादा अवयव निरुपयोगी होण्यामुळे मूत्रपिंड, यकृत, फुप्फुसे अशा अनेक भागांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यावर उपाय म्हणजे निकामी अवयव बदलून टाकणे पण त्यासाठी मोठ्या प्रमाणावर अवयवदान हे झाले पाहिजे.

आता सुनील देशपांडे यांची 'अवयवदान' प्रतिज्ञा राज्य सरकारने अधिकृतपणे घोषित केलेली आहे.

'अवयवदान प्रतिज्ञा'

''माणुसकी हा माझा मूळ धर्म आहे. पिडितांच्या व गरजूंच्या जीवनात आनंद फुलवणे हीच माणुसकीची खरी शिकवण आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

अवयवदानामुळे गरजू रुग्णांच्या जीवनात आनंद फुलविणे शक्य आहे. तसेच मृत्यूपंथाला लागलेल्या व्यक्तीला नव्याने जन्म देता येतो. त्यामुळे हे सर्वांत मोठे पुण्यकर्म आहे यावर माझा विश्वास आहे.

मी प्रतिज्ञा करीत आहे की माझ्या शरीरात जे जे अवयव दुसऱ्या जीवात आनंद फुलवू शकतील अशा अवयवांवर माणुसकीचा पहिला हक्क व अधिकार असेल. माझ्या अवयवांचा अशा माणुसकीच्या पुण्यकार्यासाठी उपयोग झाला पाहिजे असा माझा आग्रह आहे.

माझ्या पुढील पिढ्यांनी या आग्रहाचा मान राखावा म्हणून मी सतत स्मरण देत राहीन आणि पुढील पिढ्यांवर तसेच संस्कार हवेत यासाठी मी प्रयत्नशील राहीन.

इतकेच नव्हे तर 'गीता' मध्ये देखील अवयवदानाचे महत्त्व सांगितले आहे.

न भूप्रदान न सुवर्णदान न गोप्रदान न तथान्दानम् ।
यथा वदन्तीह महाप्रदान सर्वेषु दनिष्वभयप्रदानम् ॥

याचा अर्थ असा की, जसे भूप्रदान नाही. सुवर्णदान नाही, गोदान नाही आणि तसेच अन्नदान नाही. या सर्व दानांपेक्षा जीवनदान सर्वांत श्रेष्ठ आहे म्हणूनच प्रत्येक व्यक्तीने अवयवदान केले पाहिजे व समाजात दुसऱ्यांना देखील त्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

***

क्या है बेटियाँ ?

अमृता चव्हाण
SYBCA

बोये जाते हैं बेटे, और आ जाती है बेटियाँ ।
खाद और पानी बेटों में और लहलहाती है बेटियाँ ।

एवरेस्ट की ऊँचाईयों तक ठेले जाते हैं बेटे
और पढ जाती है बेटियाँ ।

सुख का स्वप्न दिखाते है बेटे,
जीवन का यथार्थ हैं बेटियाँ ।
जीवन तो बेटों का है, और मारी जाती है बेटियाँ ।

रुलाते हैं, कई तरह गिराते है बेटे, और
संभालती है, सजाती है बेटियाँ

मोबा. : ९८२२०८३४२३
९८६०६०८०४४

कदम ट्रेडर्स







आमच्याकडे ॲसीड, फिनेल
तसेच सॅनीटरी साहित्य योग्य दरात मिळेल.

सफाई कामगार पुरविले जातील. तसेच साफसफाईची कामे घेतली जातील.

मु. डोळेगांव, पो. वेचले, ता. जि. सातारा.

मायबोली मराठी



प्रिती निगडे
FYBCom

महाराष्ट्र जीजाऊंच्या संस्कारांचा, शिवबांच्या विचारांचा आणि शंभूच्या पराक्रमांचा महाराष्ट्र. बाबासाहेबांच्या लेखनीचा अण्णा भाऊसाठेंच्या मातृभाषेला प्रथम मी मानाचा मुजरा करते व माझ्या निबंध लेखनास सुरुवात करते.

मायबोली मराठीला माझ्या
कशी अमृताची गोडी
बालकाच्या मुखातून
बाले बोलती बोबडी ।।

गित संगितातून वाहे तिचे
मंजूळ ते स्वर
उमटूनी गोड शब्द
वाटे कानाशी मधुर ।।

कड्याकपाऱ्यातून गायले
थोरांचे पोवाडे
माझ्या माय मराठीने
दिले शिक्षणाचे धडे ।।

मायबोली मराठी माझी
जशी पहाटेची गाणी
भक्तीरसातून वाहे
तुकोबांची अमृतवाणी ।।

आपण सहज अभिव्यक्त होण्याची सहजसुंदर भाषा म्हणजे मराठी होय. तिच्या समृद्धीसाठी प्रत्येकाने भरघोस असे प्रयत्न केले पाहिजेत. मला मराठी भाषा माझ्या आई इतकीच प्रेमळ वाटते. माझे माझ्या आईवर जितके प्रेम आहे, तेवढेच प्रेम माझ्या मराठीवर ही आहे. मराठी शिवाय मी माझ्या आयुष्याची कल्पनाच करु शकत नाही. माझ्या मराठी भाषेला दोन हजार वर्षाचा वारसा लाभलेला आहे. एखादी भाषा समृद्ध होते ती शब्दांनीच. आधुनिक तंत्रज्ञान, नवीन जीवनशैली, नवे अनुभव तसेच इतर संस्कृतीशी होणारे आदानप्रदान यांमुळे मुळच्या भाषेत इतर शब्दांची भर पडत जाते.

कवी गिरीबाल म्हणतात - ''आमुच्या ओठी शब्द मराठी, प्रेमळ सर्वांसाठी''. आभाळपरी मोठे मन तन झिजवण्यासाठी, रक्तामधली मानवतांही, उसळे वेगावून, घरांतून अभंग, ओवी जपुली आम्ही गाणी. आमुच्या ओवी शब्द मराठी प्रेमळ सर्वांसाठी मराठी भाषा ही तिच्या प्रादेशिक रुपांतून तसेच प्रचलित बोलीतून निर्माण होणारी भाषा आहे. मराठी भाषेला व तिच्या साहित्याला जी संपन्नता व ऐश्वर्य लाभले आहे, याचा सर्वांना नि:संशयपणे अभिमान वाटला पाहिजे.

मराठी म्हणजे गोडवा,
मराठी म्हणजे प्रेम,
मराठी भाषा म्हणजे संस्कार,
मराठी म्हणजे आपुलकी,
मायबोली मराठीला माझ्या,
मायेचा ओलावा,
वेगवेगळ्या शब्दांलकारातून,
घेते हृदयाचा खोलावा ।।

स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात ''वाजवी किमतीला जे ग्रंथ उपलब्ध आहेत, ते सर्वांनी घेतले पाहिजेत. मराठी साहित्याने महाराष्ट्रातील जीवनाच्या सर्व कक्षा व्यापल्या गेल्या पाहिजेत''. एखादी भाषा उत्कर्षाला चढते, ती राजसत्तेच्या किंवा विद्यापीठाच्या आश्रयाने नव्हे, तर बहुजन समाजाच्या जोम व जिव्हाळ्याने. लीळाचरित्रात सांगितलेली 'चिऊ - काऊ' ची गोष्ट आजही घराघरात सांगितली जाते. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी ठोस असे कार्यक्रम आखले गेले पाहिजेत.

१) शालेय स्तरावर तसेच विद्यालयीन स्तरावर एक भाषिक संवादाच्या स्पर्धा आयोजित करणे.
२) संगणकावर तसेच भ्रमणध्वनीवर येणारे इंग्रजी भाषेतील संदेश मराठीत रुपांतर करुन पुढे पाठवणे.
३) मराठी संवर्धनाची सुरुवात घरापासूनच केली पाहिजे. घरातील लहान मुलांना उत्कृष्ट अशा कवींची, लेखकांची ओळख करुन दिल्याने त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो.
४) इंग्रजी भाषेतील मुलांमध्ये मराठीची आवड निर्माण करण्यासाठी त्यांच्याशी काही वेळ मराठीतच संवाद केला पाहिजे.

तरुणांमध्ये मराठीबद्दल उदासीनता दिसून येते, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समस्त तरुणांनी मराठीला खांद्यावर घेऊन एक नवीन प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे. १ मे १९६० रोजी मराठीने महाराष्ट्रातच देशातच नव्हे तर परदेशातही आपल्या कर्तृत्वाचे झेंडे रोवले आहेत. मराठीचा गोडवा परदेशी लोकांनीही मान्य केला आहे.

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी ।
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ।
धर्म, पंथ, जात एक मानतो मराठी ।
एवढ्या जगात माय मानतो मराठी ।।

संत ज्ञानेश्वरांच्या साजुक, सात्विक रचनांमधून माधुर्याचा गोडवा जाणवतो. तसेच रांगडेपणा व ठसकेबाजपणा हा लोकगीतांमधून व पोवड्यांमधून जाणवतो. गोंड, भिल्ल, पावरी, वारची, मावची तसेच कोरकू, कोलामी, कातकरी, माडिया इत्यादी बोलीभाषा या प्रमुख आहेत. तसेच तेथील भौगोलिक परिसरानुसार कोल्हापुरी, चंदगडी, नागपूरी, कोकणी, मराठवाडी, वऱ्हाडी या बोलीभाषा आपला प्रादेशिकपणा जपता जपता मराठीचा दर्जा ही निष्ठेने पेलतात. कारण ''भाषा जगली, तरच ती टिकते''. मराठीच्या संगोपनातून मराठीपणा व मराठीबाणा हा झऱ्यासारखा झुळझुळू वाहताना दिसतो.

बेळगावी, मालवणी, मोरसमराठी, झाडी बोली, तंजाविरी, जामनेरी, खाल्ल्यांअंगी, वरल्याअंगी, डोंगररांगी, तप्तांगी, अहिराणी, खानदेशी हे मराठीचे काही उपप्रकार आहेत. भिन्न, भिन्न प्रकार असले तरी मराठीचा दर्जा कुठेच कमी होताना दिसत नाही. उलट उच्चारागणिस मराठीचा गोडवा हा वाढतच जातो. कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणतात -

माझ्या मराठी मातीचा लावा, ललाटास टिळा
तिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोऱ्यांतील शिळा ।।

माझी सर्वांना एकच कळकळीची विनंती आहे.

मराठी माझी छान, उंच तिची मान ।
बाळगा सार्थ अभिमान, आपुसुकच होईल सन्मान ।।

मराठी भाषेबद्दल लिहाव तितक कमीच आहे. कारण ति आपली लहानपणापासूनची एक सखी, मैत्रीण आहे. मला माझ्या मराठी भाषेसाठी एवढच लिहावस वाटत की,

मायमराठी तुझिया पायी, तन, मन, धन मी वाहियले
तुझिया नामी, तुझिया धामी, अखंड रंगुनी राहियले ।।

आमुच्या मनामनात दंगते मराठी ।
आमुच्या रगारगात रंगत मराठी ।
आमुच्या उराउरात स्पंदते मराठी ।
आमुच्या नसानसात नाचते मराठी ।
येथल्या नभांमधून वर्षते मराठी ।
येथल्या पिकांमधून डोलते मराठी ।
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी ।
येथल्या लहानग्यात खेळते मराठी ।।

महाराष्ट्र म्हणजे कष्टकरी शेतकरी तसेच दीनदलित दुबळ्यांचा, अहो. १०५ हुतात्म्यांचा आणि दिल्लीच्याही तख्ताला २ घाम फोडणाऱ्या माझ्या जीगरबाज मावळ्यांचा. या महाराष्ट्राची मातृभाषा मराठी ही मला माझ्या प्राणाहूनही प्रिय आहे.

***

'महर्षी' नियतकालिकास

आरती अगुंडे


Training Services
DIGITAL SHENDE
Mentor Speaker
- Digital Marketing
- Web Development
- Android Application Development

digitalshende@gmail.com
9325 85 6311

THIS JANUARY

TRANSFORM YOURSELF WITH

BE FIT



SATARA'S FIRST
ONLY 'LADIES' GYM
EQUIPPED WITH ALL IMPORTED EQUIPMENTS



- CARDIO TRAINING
- PERSONAL TRAINING
- BATCH TRAINING
- WEIGHT TRAINING
- HIGH INTENSITY INTERVAL TRAINING

GET TRAINED WITH PROFESSIONAL ATHELETES





Also Available for Pregnant Women

BE FIT

Special Ladies GYM

Call: +91 99607 06575


- CARDIO TRAINING
- PERSONAL TRAINING
- BATCH TRAINING
- WEIGHT TRAINING
- HIGH INTENSITY INTERVAL TRAINING
- CROSS TRAINING



TRAINER SONIKA SANGWAN
(MINI OLYMPIC BOXING MEDALIST MAHARASHTRA)

Kangaroas cannot move backward.

सागवेकर (लांजेकर) गोल्ड स्मिथ



आमच्याकडे
सोने-चांदीचे दागिने तयार,
बनवून मिळतील व
दुरुस्ती करुन मिळेल.



पत्ता- २१८, भवानी पेठ, झारी बोळ, सातारा.
प्रोप्रा. - संतोष ग. सागवेकर
मोबा. ८८०५२५३२३६

Vinod Dixit 9850694669







Hi-Tech Systems

- Laptop & Desktop Sales
- Inkjet Cartridges & Toners
- CCTV & Security Systems
- Printer Repairing
- Computer Consumables
- Laptop Repairing
- Attendance Systems

Shop No. 3, Chavan Complex, Opp. Kotak Mahindra Bank,
Near Panchayat Samiti, Sadar Bazar, Satara-415 002.

सौरव बाचल
9158808182

हॉटेल निर्मल फॅमिली रेस्टॉरंट

सिटी इलेवन कॅफे

५०१/ब/१, निर्मल हॉटेल, देशमुख कॉलनी जवळ, SBI बँक शेजारी, सातारा.

आदर्श बोगरे
9503080020

रघुनाथ बोगरे
9158569194





आदिशक्ती

साऊंड & लाईट डेकोरेशन

शुभकार्यासाठी लागणारी सर्व प्रकारचे लाईट डेकोरेशन तसेच साऊंड सिस्टीम, जनसेट, टेबल-खुर्ची, स्टॅण्ड फॅन, कुलर, प्रोजेक्टर मंडप इ. वस्तू योग्य दरात भाड्याने मिळतील.

प्रोप्रा. उदय गुजर
निवास : २३२१०७
मोबा. : ९४२३०३४१०७



केटरिंग सवा लग्न आणि मुंजी इत्यादी कार्यासाठी लागणारे सर्वप्रकारचे साहित्य भाड्याने मिळेल.

।। श्री मंगल सेवा ।।



६४, शनिवार पेठ, सातारा.




तेजस पाटील
8975070007



तेजस ज्वेलर्स

सोने | चांदी | हिरेमाणिक

साईबाबा मंदीरासमोर, गोडोली, सातारा.



W2Q गुरुवार, दि. १० ऑगस्ट २०२३ रोजी 'W20'- एक पाऊल सक्षमतेकडे विषयावर बीसीए कॉलेज व उमेद अभियान महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा पार पडली. यासाठी **मा. श्री. संतोष हराळे** (प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जि.प.सातारा.), **मा. डॉ. नलिनी पाटील** (SNDT विद्यापीठ, मुंबई) व **मा. डॉ. मंजू हुंडेकर** (महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, पुणे) यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याची काही क्षणचित्रे....











युवा महोत्सव

गुरुवार, दि. ९ व १० सप्टेंबर २०२३ रोजी पश्चिम महाराष्ट्र विभागीय युवा महोत्सव पार पडला. **मा. अश्विनी शेंडगे** (उपअधिक्षक, दहिवडी पो.स्टेशन), **डॉ. नितीन प्रभूतेंडोलकर व अभिनेत्री सायली शिर्के-माने**, बीसीए कॉलेज कमिटी पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला. त्याची निवडक क्षणचित्रे....












कॉलेज कोर्सेस : BCA | BA | B.Com | B.Com (Voc)

वैशिष्ट्ये :

* नॅक मान्यताप्राप्त महिला महाविद्यालय.
* सातारा शहरामध्ये मध्यवर्ती ठिकाणी सर्व सोयींनीयुक्त सुसज्ज इमारत.
* सातारा जिल्ह्यातील व आशिया खंडातील पहिल्या महिला विद्यापीठाशी संलग्न.
* २४ वर्षांची यशस्वी वाटचाल.
* उत्कृष्ट निकालाची परंपरा व विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विद्यार्थिनींचा समावेश.
* अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक वर्ग.
* इंटरनेट कनेक्शनसह सुसज्ज वायरलेस कॉम्प्युटर लॅब.
* इन्फोसिस, टी.सी.एस., विप्रो व इतर नामांकित सॉफ्टवेअर कंपन्यामार्फत कॅम्पस इंटरव्ह्यू.
* सुसज्ज ग्रंथालय, स्वतंत्र अभ्यासिकेची सोय.
* राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमात सहभाग.
* स्वतंत्र क्रीडा व सांस्कृतिक विभाग.
* मागासवर्गीय विद्यार्थिनींना समाजकल्याण मार्फत स्कॉलरशिपची सोय.
* नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रम
* वायफाय कँपस

अभ्यासाव्यतिरिक्त इतर करिअर ओरिएंटेड कोर्सेस

Foreign Language | Spoken English | Personality Development
IBPS Guidence | Basic Computer Course | MKCL KLiC Courses | Tally ERP 9.0



NEP

NAAC ACCREDITED

W20 INDIA 2023 WOMEN

AICTE

Maharshi Karve Stree Shikshan Samstha's

MAHARSHI KARVE MAHILA MAHAVIDYALAY, SATARA.

(Faculty : BCA, BA, B.Com.)

714/A, Shaniwar Peth, Satara. Phone : (02162) 227647 / 231052
E-mail : bca_college@rediffmail.com
Website : www.maharshikarvebcasatara.org
(Affiliated to S.N.D.T. Women's University, Mumbai)
NAAC Accredited with 'B+' Grade
Govt. Sanction letter No. NGC/1000/NMV / (167/2000) Mashi-3. Date 29 June 2000

Lokmangal / 9822755096